# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे

सर्व्हे क्र.८३२ अ, फायनल प्लॉट क्र.१७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४


## -: निवेदन :-

**इ.१२वी, पुनर्रचित अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व तदनुषंगिक बाबींसंदर्भात उच्च माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत...**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत येणा-या क.महाविद्यालयातील उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी इ.१२वी, पुनर्रचित अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व त्या तदनुषंगिक बाबींसंदर्भात सर्व विषयांचे ऑनलाईन प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे, हे प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. या प्रशिक्षणासाठी उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विषय शिक्षकांची ऑनलाईन नाव नोंदणी करुन घेण्यात येत आहे. उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी प्रशिक्षणास प्रविष्ठ होण्यासाठी मंडळाच्या evaluation.mh-hsc.ac.in या वेबसाईटवर दिलेल्या विहित प्रपत्रात/फार्म मध्ये आपली माहिती दि.०१ ते ०८ ऑक्टोबर २०२० या कालावधीत भरावयाची आहे. त्यानंतर सदर लिंक बंद केली जाईल.

तरी उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विषय शिक्षकांनी इ.१२वी, पुनर्रचित अभ्यासक्रमाचा मूल्यमापन आराखडा व तदनुषंगिक बाबींसंदर्भात ऑनलाईन प्रशिक्षणासाठी विहित मुदतीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

**दिनांक: ३०/०९/२०२०**
**राज्यमंडळ, पुणे-०४.**

**(डॉ.अशोक भोसले)**
**सचिव**
**राज्य मंडळ, पुणे.**

# प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी ऑनलाईन नोंदणी व प्रशिक्षणासाठी सूचना

१) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करताना सर्व माहिती अचुक भरुन फार्म सबमिट करावयाचा आहे. अपूर्ण भरलेला फॉर्म स्विकारला जाणार नाही.

२) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी ते शिकवित असलेले मुख्य विषय व त्या सोबतच इतर विषय शिकवित असल्यास ते क्रमाने नोंदवावेत. शिक्षक प्रत्यक्ष शिकवित असलेले जास्तीत जास्त ४ विषय प्रशिक्षणासाठी नोंदविता येतील. तथापि संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांनी सदर शिक्षक हे विषय शिकवित असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

३) फार्म भरताना कोणतेही विरामचिन्हे वापरु नयेत.

४) आपल्या उच्च माध्यमिक शाळेचा 'सांकेतांक' व 'यु-डायस' क्रमांक टाकल्यावर आपण कार्यरत असलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळाकडे संग्रहित असलेलेली माहिती आपोआप दर्शविण्यात येईल, ती पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.

५) माहिती देवनागरी लिपी-Unicode व इंग्रजीत भरता येईल.

६) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी अलिकडच्या काळातील फोटो स्कॅन करुन JPEG किंवा JPG फॉर्मेट मध्येच अपलोड करावयाचा आहे. कागदावर सही करुन ती स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. फोटो व सहीची साईज जास्तित जास्त 256kb असावी. जास्त kb साईज असलेले फोटो किंवा सही अपलोड होणार नाही.

७) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी नोंदणी फॉर्म भरुन सबमिट केल्यानंतर प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या प्राचार्यांच्या दिलेल्या मोबाईल क्रमांकावर OTP जाईल, प्राचार्यांच्या मोबाईल क्रमांकावर आलेला OTP टाकल्या नंतरच प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी पुर्ण होईल व प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी पात्र होईल त्यांनाच प्रशिक्षणाची लिंक प्राप्त होईल.

८) अपुर्ण भरलेला फॉर्म सबमिट होणार नाही, त्यामुळे त्यांची नोंदणी होऊ शकणार नाही, याची नोंद घ्यावी.

९) प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर फॉर्मचा Part-B भरावयाचा आहे. तो भरुन सबमिट केल्यावर ई-प्रमाणपत्र जनरेट होईल. त्याची प्रिंट प्रशिक्षणार्थी यांना घेता येईल, त्याची एक प्रत प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालय प्रमुखांकडे जमा करावयाची आहे.

१०) लिंक मर्यादीत काळासाठी असल्याने विहित मुदतीत फॉर्म भरावेत, मुदतीनंतर लिंक बंद होईल. प्रशिक्षणासाठीची लिंक पाठविताना कोणत्या ॲपच्या माध्यमातून आपल्या विषयाचे प्रशिक्षण होईल ते कळविण्यात येईल.

***